# श्री मार्तंड देव संस्थान, जेजुरी

जावक क्रं.: २४१७/२०२५ — दि. १३/११/२०२५

श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

(रजि.क्र.ए-७०८)

श्री क्षेत्र जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे

## जाहीर निविदा

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी या न्यासाच्या वतीने खालील कामांची पूर्तता करणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत-

(१) चंपाषष्ठी उत्सवानिमित्त आपत्कालीन दत्त मंदिर गेट पासून अंध, अपंग, दिव्यांग, ७० वर्षापुढील जेष्ठ नागरिक व देणगीदार भाविक यांना श्री खंडोबा मंदिर पश्चिम दरवाजा बाजूला पार्किंग येथे घेऊन जाणे व पुन्हा खाली घेऊन येणेकामी रोजंदारी/उक्ते तत्वावर चारचाकी ५ वाहने पुरविणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(२) चंपाषष्ठी उत्सवानिमित्त बंदोबस्ता करिता येणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे भोजनाची व्यवस्था करणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन निविदा भरणे.)

टीप :- उपरोक्त कामांबाबत ऐच्छिक देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो.क्र.-९३७०४५९४३३/९७६३०४४०१७)

**नियम व अटी**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रीयेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु.५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडर धारकांनी आपल्या निविदा दि. १४/११/२०२५ ते दि.१७/११/२०२५ पर्यंत स.१० ते सायं. ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई. निविदा धारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ www.khandoba.com येथे उपलब्ध आहे.

६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

## निविदा जमा करण्याचे ठिकाण

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

"मल्हार" भक्तनिवास (दुर्गामाता चौक)

जेजुरी, ता. पुरंदर, जि.पुणे.

सही/-
**आशिष मारूती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

शिक्का

सही/-
**मंगेश अशोक घोणे**
अध्यक्ष
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी